2 5 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरु होते : डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर :** ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरू होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग जिल्हा मराठी अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी विषय अध्यापनातील सर्जनशील कौशल्य' या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, बालवाडी ते विद्यापीठ हे दोन शिक्षणातील बिंदू गुणात्मक पद्धतीने जोडण्यासाठी अशा कार्यशाळा व संवाद महत्त्वाचे ठरतील.

याप्रसंगी कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघ कोल्हापूरचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी मनोगतात अध्यापक संघाच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात निती बडवे यांनी मांडणी केली. दुसऱ्या सत्रात सुचिता पडळकर यांनी मांडणी केली. दीपक मेंगाणे यांनी मांडणी केली.

यावेळी नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, सुस्मिता खुटाळे, डॉ. सुखदेव एकल उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
तरुण भारत

# ज्ञानाची प्रक्रिया भाषेतून सुरू होते

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्ञानाची प्रक्रिया भाषेपासूनच सुरू होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. 'मराठी विषय अध्यापनातील सर्जनशील कौशल्य' हा कार्यशाळेचा विषय होता.

डॉ. शिर्के म्हणाले, बालवाडी ते विद्यापीठ हे दोन शिक्षणातील बिंदू गुणात्मक पध्दतीने जोडण्यासाठी कार्यशाळा व संवाद महत्वाचे ठरतील. प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थी केंद्रित शिक्षणपध्दती अधिकाधिक विकसित करण्यासाठी या कार्यशाळा निश्चितपणे उपयुक्त आहेत. कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघ कोल्हापूरचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी अध्यापक संघाच्या कार्याचा आढावा घेतला. पहिल्या सत्रात नीती बडवे म्हणाल्या, भाषा हा ज्ञान संपादनाचा पाया असून अभिव्यक्ती आणि कौशल्यासाठी भाषा महत्वाची ठरते. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात 'भाषिक अनुभव देणे म्हणजे काय' या विषयाच्या अनुषंगाने सुचिता पडळकर यांनी मांडणी केली. 'भाषा अध्यापनातील विविध दृष्टीकोन' या विषयावर दीपक मेंगाणे यांनी मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. या कार्यशाळेसाठी जिल्हाभरातून दोनशेहून अधिक शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
Times of India

# Vijay Fulari takes charge as new vice-chancellor for Bamu

Prasad Joshi
@timesgroup.com

Chhatrapati Sambhajinagar: A day after the formal announcement of his name from the office of Maharashtra Governor, Vijay Fulari took charge of Dr Babasaheb Ambedkar Marathwada University (Bamu) as its new vice-chancellor on Wednesday.

The new vice-chancellor is a PhD scholar and has served at Shivaji University in Kolhapur. He comes with an intensive experience of 32 years in teaching, including 27 years of dedicated experience in research, according to a press release issued by the university.

Fulari (58) has filed four research patents in physics and has 152 published research projects to date. Fulari, who has authored a book named 'Multifunctional Materials', has guided 157 postgraduate students and 20 PhD students until now for their respective courses.

TOI



Vijay Fulari is a PhD scholar

"I took the reins of the university by remembering the inspiring thoughts of BR Ambedkar. The university has a long-standing tradition, and it is my honour to serve the university," Fulari said.

He took the charge from Pramod Yeole, a pharmacist-cum-researcher who concluded his term as the VC towards the end of last year. Fulari, who formally took charge from the acting VC Suresh Gosavi, called for cooperation from all stakeholders during his tenure at one of the oldest universities in the country.

Fulari was in the race for the VC in the past and was among five shortlisted candidates, one of the members of the management council of Bamu said.

"The new VC comes with vast experience. Let us hope he emerges as an able administrator and takes the university to a new level," he said, requesting anonymity.

Bamu was established on Aug 23, 1958, and has jurisdiction over half of the districts in the Marathwada region, including Chhatrapati Sambhajinagar, Jalna, Beed, and Osmanabad. These places have a student strength of over 4 lakh.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
क्रांतीसिंह

# विद्यापीठ लोकपालपदी न्या. सुधीर कुलकर्णी

कोल्हापूर (प्रतिनिधी):- प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश (सेवानिवृत्त) सुधीर पुरुषोत्तम कुलकर्णी यांची शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम लोकपालपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली. विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली यांच्या दि. ११ एप्रिल २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष व लोकपाल नियुक्ती करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या अधिसूचनेतील



तरतुदीनुसार मा. कुलगुरू यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या निकालाबाबत अपिलीय अधिकारी व लोकपाल म्हणून निवृत्त न्या. सुधीर पुरुषोत्तम कुलकर्णी यांची नुकतीच नियुक्ती केलेली आहे. या नियुक्तीस त्यांनी स्वीकृती दर्शविली आहे. न्या. कुलकर्णी यांनी बी.एस्सी. (ऑनर्स) व एल.एल.एम. पदवीनंतर मार्च १९८८मध्ये अहमदनगर येथे विधी सेवा रुजू केली. नांदेड येथून मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरुन ते सप्टेंबर २०१८मध्ये निवृत्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024

लोकमत

# 'नॅनोसायन्स'चा मेळावा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अॅण्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागात शनिवारी पालक मेळावा उत्साहात पार पडला. डॉ. के. के. शर्मा, डॉ. के. व्ही. खोत, डॉ. के. डी. पवार, डॉ. वाय. वाय. पाटील, डॉ. एस. ए. सावंत, एम. एन. पाडवी, डॉ. पी. जे. पाटील यांनी विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांवर मार्गदर्शन केले. डॉ. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
लोकमत



# आमोद दंडगे यांची तबलावादन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील पंडित आमोद दंडगे यांची तबलावादन कार्यशाळा झाली. या लय-लयकारी, तालशास्त्र, रियाज संकल्पना, तिहाई व चक्रदार सौंदर्यतत्त्वाविषयी मार्गदर्शन केले. तबल्याच्या घराण्यांतील बंदिशी व तिहाईतील भाषा सौंदर्य यावर विवेचन केले. तबल्यातील व्याकरण, लघु-गुरू विचार, तसेच तबल्यातील पढंतचे महत्त्व त्यांनी सांगितले.

गिरीधर कुलकर्णी, प्रदीप कुलकर्णी, डॉ. निखिल भगत उपस्थित होते. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन कचोटे यांनी परिचय करून दिला. विक्रम परीट, संदेश गावंदे, अतुल परीट, मल्हार जोशी यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
लोकमत

# 'लेक वाचवा, लेक शिकवा'चा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, समाजशास्त्र अधिविभाग व पुनाळ (ता. पन्हाळा) येथील सरदार रामचंद्र बाडे आर्टस, कॉमर्स, सायन्स महाविद्यालयाच्या वतीने 'लेक वाचवा, लेक शिकवा' विषयावर पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. बस स्टँड, बिंदू चौक व भवानी मंडप येथेही जनजागृती केली. सायली कांबळे, रेणू कांबळे, मयूरी निर्मळ, श्रावणी भोई, राजश्री झुटाळ, बानू मुल्ला, स्नेहल चाळके, सानिका कांबळे यांनी पथनाट्य सादर केले. जीवनप्रकाश माळवी, श्रीधर बाडे, प्राजक्ता साळोखे, विशाल ढाकवे, गणेश हसबे, पवन कांबळे, विष्णू कांबळे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
2 5 JAN 2024 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सातार्‍यात शिवाजी विद्यापीठ उपकेंद्रासाठी जागा निश्चिती सुरू

## समितीकडून पाच जागांची पाहणी

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** सातार्‍यात शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र उभारण्यासाठी विद्यापीठाने गठित केलेल्या सात सदस्यीय समितीने उपकेंद्रासाठी आवश्यक ५० एकर जागेसाठी सातारा पॉवरहाऊस, कारंजे तर्फ, लिंबखिंड, आरफळ व क्षेत्रमाहुली येथील शासकीय भूखंडांची पाहणी केली. जागा समिती जागा निश्चिती करून तसा अहवाल लवकरच विद्यापीठाला सादर करणार आहे.

सातार्‍यात शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे म्हणून लोकप्रतिनिधी, विद्यार्थी संघटनांनी अनेक वर्ष संघर्ष केला, विद्यापीठाकडे सातत्याने मागणी केली, वेळोवेळी आंदोलनेही केली होती. आता या उपकेंद्राला मंजुरी मिळून ते उभारण्यासाठी प्रत्यक्ष प्रक्रियाही सुरू झाली आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेसह विद्यार्थी, पालकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार भविष्यात हे स्वतंत्र विद्यापीठही ठरू शकेल. सातार्‍यातील उपकेंद्र म्हणजे छोटेखानी विद्यापीठच असणार आहे. त्यात विविध अभ्यासक्रम सुरू होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने नेमलेल्या सात सदस्यीय समितीमध्ये अध्यक्षपदी प्रा. डॉ. राजेंद्र शेजवळ (सातारा), सदस्य म्हणून प्रा. जगदीप सपकाळे, प्रा. वर्षा मैंदर्गी (कोल्हापूर), प्राचार्य शिवलिंग मेनकुदळे, सिनेट सदस्य अमित कुलकर्णी, सारंग कोल्हापुरे (सातारा), अमित जाधव (तासवडे, ता. कराड) यांचा समावेश आहे.

या समितीसोबत जागा पाहणीवेळी तलाठी सचिन शेटे व महसूल कर्मचारी उपस्थित होते. समितीने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी विद्यापीठ उपकेंद्रासाठी सकारात्मकता दर्शवत सहकार्याची ग्वाही जिल्हाधिकार्‍यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
लोकसत्ता

# हवामान बदलावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने उद्या गुरुवारी हवामान बदल आणि प्रसारमाध्यमे या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील इंडियन एक्स्प्रेसचे सहायक संपादक पार्थसारथी बिस्वास आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर एन्व्हायरमेंट अ‍ॅन्ड डेव्हलपमेंटच्या प्रकल्प व्यवस्थापक इरा देऊळगावकर उपस्थित राहणार आहेत. पार्षद शहा आणि पेषित शहा या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'पेर्व्हिग ब्लॉक' या शॉर्टफिल्मचे सादरीकरण करण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024

पुढारी

# 'नॅनोसायन्स विद्यार्थी देश-विदेशात कार्यरत'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठामधील नॅनोसायन्स अधिविभागात शिक्षण घेतलेले विद्यार्थी देश-विदेशात विविध क्षेत्रांत कार्यरत असून, त्यांनी यश संपादन केले आहे, असे मत आयोजित पालक मेळाव्यात व्यक्त करण्यात आले.

यावेळी डॉ. के. के. शर्मा, डॉ. के. व्ही. खोत, डॉ. के. डी. पवार, डॉ. वाय. वाय. पाटील, डॉ. एस. ए. सावंत, श्री. एम. एन. पाडवी, डॉ. पी. जे. पाटील यांनी अधिविभागाच्या शैक्षणिक आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा, संशोधन, उपलब्ध सुविधा, नोकरीच्या संधी, परीक्षा, शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियाबाबत प्राध्यापकांनी विस्तृत माहिती पालकांना दिली. अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. के. व्ही. खोत यांनी केले, तर डॉ. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
पुढारी

# 'अशक्यतेच्या स्वयंसिद्धतेला आव्हान द्या' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चांगले भविष्य शोधणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. एम. एम. साळुंखे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात आयोजित व्याख्यानात 'अशक्यतेच्या स्वयंसिद्धतेला आव्हान द्या,' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. साळुंखे यांनी अदृश्य तंत्रज्ञानामागचे विज्ञान सोप्या भाषेत सांगितले. मानव संसाधन, ज्ञानाचा अखंड दृष्टिकोन आणि नवकल्पनांचे शाश्वत चक्र या मानवी जीवनात महत्त्वाच्या बाबी आहेत. स्पर्धात्मक जगात ज्ञाननिर्मिती आणि नावीन्यता महत्त्वाची आहे. पृथ्वीवरील संसाधनांचे अनियंत्रित शोषण यावर त्यांनी भाष्य केले. सिद्धी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. के. वाय. राजपुरे, प्रा. एम. व्ही. टाकळे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, श्री. एन. के. चव्हाण यांच्यासह विभागांतील विद्यार्थी उपस्थित होते. भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
सकाळ

# प्राध्यापक महासंघाच्या सचिवपदी कोरबू



प्रा. कोरबू

कोल्हापूर : अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या विभागीय सचिवपदी प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांची बिनविरोध निवड झाली आहे. कानपूर (उत्तर प्रदेश) येथे महासंघाचे १९ ते २१ जानेवारीदरम्यान झालेल्या वार्षिक अधिवेशनामध्ये त्यांची दोन वर्षांसाठी या पदावर निवड करण्यात आली. सध्या ते शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या कोल्हापूर जिल्हा शाखेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्याकडे पश्चिम विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या अधिवेशनामध्ये सर्व पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली. त्यात प्रा. नागराजन (महासंघ अध्यक्ष), अरूण कुमार (प्रमुख कार्यवाह), डी. कुमार (खजिनदार) यांचा समावेश आहे. या अधिवेशनासाठी प्रा. ए. बी. पाटील, सुधाकर मानकर, गजानन चव्हाण, विजय देसाई, डी. एन. पाटील, उत्तम वाघमारे, उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
तरुण भारत

# सहकार क्षेत्रात बहुस्तरीय संधींची उपलब्धता

■ विभागीय सहनिबंधक अरुण काकडे

प्रतिनिधी
कोल्हापूर

सहकार क्षेत्राचे जाळे व्यापक असून या क्षेत्राला कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये बहुस्तरीय संधीची उपलब्धता असून त्यांचा युवा पिढीने लाभ घेण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन सहकारी संस्था कोल्हापूरचे विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, बँक ऑफ इंडिया चेअर आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' यावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

काकडे म्हणाले, सहकार क्षेत्रात शेती पतपुरवठा संस्थांबरोबर अनेक संस्था आहेत. यामध्ये जिल्हा बँका, सहकारी बँका, पतसंस्था, सामुदायिक शेती संस्था, साखर कारखाने, दुग्ध व पशुसंवर्धन संस्था, मच्छीमार संस्था, पणन, शेतीमाल, ग्राहक संस्था, यंत्रमाग व सूतगिरण्या, औद्योगिक वसाहती, गृहनिर्माण संस्था आदी आहेत. महाराष्ट्रात दोन शिखर संस्थांसह २ लाख २२ हजार ७३८ सहकारी संस्था आहेत. त्यापैकी कोल्हापूर, सांगली, सातारा विभागात १४ हजार ६७८ सहकारी संस्था आहेत. अनेक संस्थांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक आदी पदांसाठी कुशल उमेदवार मिळत नाही. आत्मविश्वासाबरोबरच कामावरील श्रद्धा आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असायला हवी. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सहकाराच्या क्षेत्रात अमाप संधी असल्या तरी विद्यार्थ्यांनी आपल्याला कोणत्या स्तरावर काम करायचे आहे, याचा निर्णय व्यक्तीगत पातळीवर घेणे गरजेचे आहे. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. डॉ. राजन पडवळ यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अधिसभा सदस्य संजय परमणे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
तरुण भारत

# राज्यस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास जेतेपद

कोल्हापूर : राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथमच प्युअर सायन्स कॅटॅगरीमध्ये सर्वसाधरण विजेतेपद प्राप्त होवून सुंदरबल प्युअर सायन्स फिरता चषक मिळाला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे शुक्रवारी १२ ते १५जानेवारी या कालावधीत स्पर्धा झाल्या. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण ५० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. प्युअर सायन्स कॅटॅगरीमध्ये न्यू कॉलेजच्या मुनिफ अन्सारीने प्रथम क्रमांक मिळवला. नागठाणे येथील आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजची विद्यार्थीनी तन्वी जाधवने तृतीय क्रमांक मिळवला. पदवी, पदव्युत्तर व पदव्युत्तर पदवी या तीन स्तरातुन विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये, मानवशास्त्र शाखा, वाणिज्य व्यवस्थापन व विधी शाखा, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, मेडिसिन व फॉर्मसी शाखा, शेती व पशुसंवर्धन शाखा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा अशा एकूण ६ शाखामधून प्राविण्य मिळवले. न्यू कॉलेजच्या डॉ. कविता गजरे व सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचे डॉ. सिध्देश्वर जाधव यांनी संघव्यवस्थापक म्हणून काम पाहिले. कोल्हापूर अविष्कार समन्वयक म्हणून डॉ. पंकज पवार, विजय इंगवले व डॉ. पी. टी. गायकवाड यांनी काम पाहिले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. एच. दगडे यांचे मार्गदर्शन लाभले.